आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद,

## School Leadership Academy

## Maharashtra

## मोड्यूल क्र.६

# माध्यमिक स्तरावरील ग्रामीण भागातील किशोरवयीन मुलींचे मासिक पाळी व्यवस्थापन व शालेय नेतृत्वाची भूमिका

## Role of Adolescence Girls Monthly Hygiene Management and School Leadership at Secondary School Level

### 1. प्रस्तावना-

मासिक पाळी हा विषय खाजगी असू शकतो पण गोपनीय नाही. हा विषय चारचौघांत बोलण्यासारखा नाही अशी समाज मनात धारणा असते. किशोरवयीन मुली व महिलांच्या आरोग्याबाबतीत काळजीपूर्वक हाताळण्यासारखा हा विषय आहे. उच्च प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मुलींसाठी शासनाने अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत, परंतु मुलींचे शाळेत गैरहजर राहण्याचे,शाळा सोडून देण्याचे प्रमाण चिंताजनक आहे. आजही ग्रामीण भागात पुढील शिक्षणासाठी जवळच्या गावात / शहरात जाण्यासाठी मुलींना परवानगी दिली जात नाही.साधारणपणे वयात आल्यानंतर मासिक पाळी सुरू होते. ज्या मुलींचे वय बारा किंवा तेरा वर्षांचे असते अशा किशोरवयीन मुलींना दर 21 दिवसानंतर मासिक पाळी सुरू होते. अशा स्थितीत स्वतः मुली या गोंधळलेल्या अवस्थेत असतात .स्वतःमध्ये घडत असलेल्या शारीरिक-मानसिक व भावनिक बदलाबाबत त्या अनभिज्ञ असतात. मुलगी वयात आली म्हणून आई वडील यांना तिच्या सुरक्षिततेविषयी काळजी वाटू लागते.परिणामी मुलीचे शिक्षणच थांबवले जाते, घरातील कामकाजाच्या बाबतीत तिची मदत घेतली जाते, घरकाम करायला लावणे, लहान भावंडांचा सांभाळ करणे, स्वयंपाक करणे अशा जबाबदाऱ्या तिच्यावर सोपविल्या जातात, शिवाय वयाची अठरा वर्षे पूर्ण व्हायच्या आत बाल विवाह करून दिला जातो.हे चित्र बदलायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. मुलींचे शिक्षण म्हणजे प्रगतीचे लक्षण मानले जाते. त्यामुळे मानवी जीवन विकासाचा मुख्य स्त्रोत म्हणून शिक्षणाकडे बघायला हवे.मुलींच्या शिक्षणाला सर्व स्तरावरून प्रेरणा मिळायला हवी.मानव संसाधन विकास मंत्रालय एम एच आर डी भारत सरकार मार्फत 'स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय' हे राष्ट्रीय अभियान सप्टेंबर 2014 पासून सुरू केले आहे. आपल्या महाराष्ट्रातही ऑक्टोबर 2017 पासून शाळास्तरावर मासिक पाळी व्यवस्थापनात स्वच्छतेच्यासवयींबाबत परिपत्रक विकसित केले आहे, शालेय शिक्षणाबरोबरच पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय यांचेमार्फत महाराष्ट्रातील सर्व उच्च प्राथमिक शाळांपासून ते उच्च माध्यमिक शाळा पर्यंत किशोरवयीन मुलींच्या मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत जाणीव जागृती करण्यात येत आहे. 'स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय' या राष्ट्रीय अभियानानुसार देशातील प्रत्येक शाळेत पिण्याचे पाणी, मुला - मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, हात धुण्याची सुविधा, अपंगांसाठी स्वच्छतागृहांची विशेष सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे ,याचाच एक भाग म्हणून मासिक पाळी व्यवस्थापनाकडे लक्ष वेधले आहे .शाळेत येणाऱ्या किशोरवयीन मुलींची कोणत्याही प्रकारे कुचंबणा होऊ नये, शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी मासिक पाळी व्यवस्थापन हा विषय महत्त्वाचा आहे.

### 2. मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -

1) मासिक पाळी व्यवस्थापनातील शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.
2) मासिक पाळी व्यवस्थापनात यशस्वी शालेय नेतृत्वाचा अभ्यास करणे.
3) मासिक पाळी व्यवस्थापनात यशस्वीरीत्या काम करण्यासाठी शालेय नेतृत्वाचा योग्य दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करणे.

**3. मासिक पाळी व्यवस्थापन संकल्पना -**

मुलगी साधारण १२ - १३ वर्षाची झाल्यानंतर तिच्या योनीमार्गातून दर महिन्याला होणाऱ्या रक्तस्रावाला (menstrual cycle /MC) असे म्हणतात. ही घटना जरी शारीरिक घटना असली तरी त्याचे वेगवेगळे परिणाम दिसून येतात. मासिक पाळीचे चक्र साधारणतः २२ते २४ दिवसांचे असते. मासिक पाळी ही प्रत्येक महिन्याला व नियमितपणे येणारी बाब आहे. मासिक पाळी येण्याच्या आधी ७ ते ८ दिवस किशोरवयीन मुलींना अनेक प्रकारचे त्रास सुरू होतात. यात शारीरिक तसेच भावनिक बदलांचा समावेश होतो. उदा :- ओटी पोटात दुखणे, डोकेदुखी, कंबरदुखी, चिडचिडेपणा, थकवा इ. कारण यात हार्मोन्स मध्ये बरेच बदल होतात. मासिक पाळीच्या दरम्यान मुली शाळेत अनुपस्थित रहातात. कारण मुलींना मासिक पाळी व्यवस्थापन नीट करता येत नाही. या दरम्यान मुलींना अनेक आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागते. शाळेमध्ये स्वच्छतागृहाची सोय नसणे, पॅड बँकेची सुविधा, चेंजिंग रूम नसणे व पाण्याची व्यवस्था नसणे या सर्व कारणांमुळे मासिक पाळी दरम्यान मुली शाळेत अनुपस्थित रहातात, याचा संबंध थेट मुलींच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम करणारा असल्यामुळे या विषयाकडे गांभीर्याने बघणे आवश्यक आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या (२००९)अहवालानुसार १२% मुली या मासिक पाळीच्या दरम्यान शाळेत उपस्थित रहात नाहीत. भारतासारख्या विविध रूढी परंपरांना मानणाऱ्या देशात मासिक पाळी या विषयावर पुरुषांशी बोलणे तर दूरच, महिला महिलांशीही चर्चा करणे टाळतात. या विषयाबाबत अनेक सामाजिक, भावनिक, सांस्कृतिक समज - गैरसमज असल्याने मासिक पाळी या विषयावर चर्चा करणे अयोग्य मानले जाते.

महाराष्ट्रात युनिसेफ ने केलेल्या एका सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की, ११ ते १५ वर्षे वयोगटातील १३% मुलींनाच पहिली पाळी येण्या अगोदर पाळीबाबत माहिती होती.

६०% ते ७०% मुली या पाळी दरम्यान शाळेत जात नाहीत, अशा मुलींना जर योग्य व वेळीच मार्गदर्शन मिळाले, तर निश्चितच परिस्थितीत बदल होईल, कारण शाळा सोडण्याच्या उंबरठ्यावर उभ्या असणाऱ्या मुलींना आपण योग्य त्या सुविधा देऊन पुन्हा शाळेची ओढ निर्माण करण्यात यशस्वी होऊ. मासिक पाळी व्यवस्थापनाचे मुख्य घटक म्हणजे –

१. शाळेत मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची सुविधा
२. पुरेशा प्रमाणात शोषकांची उपलब्धता (absorbent पॅड, सुती कापडे)
३. त्यांची विल्हेवाट लावण्याची सुविधा(incinerator)
४. योग्य मार्गदर्शन.

शाळेचे मुख्याध्यापक हे शाळेचे नेतृत्व करतात. ते शाळेचे आदर्श नेते असतात. मुख्याध्यापक हे शाळेचे नियोजन, प्रशासन व व्यवस्थापन सांभाळतात.मुख्याध्यापकांनी सतत स्वयंप्रेरित राहून अपेक्षित बदल घडविणारे नेतृत्व केले पाहिजे. क्षेत्रीय अधिकारी, शिक्षक, मुख्याध्यापक या सर्वांनी शालेय नेतृत्व करीत असताना शैक्षणिक गुणवत्ता विकासाशी संबंधित सर्व बाबींकडे आवर्जून लक्ष देणे गरजेचे आहे. शाळेचे नेतृत्व करणारे मुख्याध्यापक जर शाळेमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहाची सोय, पॅड बँकेची सोय, चेंजिंग रूम ची सुविधा, पाण्याची उपलब्धता करून देत असतील, तर नक्कीच सर्व मुलींचे शाळेत गैरहजर राहण्याचे प्रमाण कमीहोण्यास मदत होईल.

**4. मासिक पाळी व्यवस्थापन - जिल्हा व राज्य स्तरावरील अहवाल व सांख्यिकीय माहिती -**

मासिक पाळीव्यवस्थापन हा कार्यक्रम राबविण्याच्या अगोदर सांगली जिल्ह्यातील शाळाबाह्य किशोरवयीन मुलींच्या एप्रिल 2017 च्या सर्वेक्षणानुसार प्राप्त माहितीच्या आधारे तालुकानिहाय संख्या –

| अ.क्र. | तालुका | शाळाबाह्य किशोरवयीन मुलींची संख्या |
|---|---|---|
| 1 | कवठे महांकाळ | 85 |
| 2 | मिरज | 185 |
| 3 | खानापूर | 0 |
| 4 | जत | 1053 |
| 5 | वाळवा | 114 |
| 6 | पलूस | 38 |
| 7 | तासगाव | 136 |
| 8 | शिराळा | 78 |
| 9 | आटपाडी | 101 |
| 10 | कडेगाव | 48 |
| **एकूण** | | **1695** |

**संदर्भ -** पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग एप्रिल 2017 च्या सर्वेक्षणानुसार.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सांगली व लुल्ला चॅरिटेबल फाऊंडेशन सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने 16 सप्टेंबर 2016 रोजी महानगरपालिका क्षेत्रातील माध्यमिक शाळेतील 100 महिला शिक्षिकांना 'कळी उमलताना'या उपक्रमांतर्गत एक दिवसीय मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रकल्प अधिकारी सौ. स्मिता नलवडे यांनी उपस्थित महिलांना MHM चे प्रशिक्षण दिले. आणि खऱ्या अर्थाने सन 2016 मध्येच सांगली जिल्ह्यात MHM चळवळीला सुरुवात झाली. यानंतर सांगली जिल्ह्यामध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सांगली व लुल्ला फाऊंडेशन बरोबर जिल्हा परिषद सांगली मधील पाणी स्वच्छता विभागाने देखील मोठ्या प्रमाणावर मासिक पाळी व्यवस्थापन विषयावर काम केले. दिनांक 4/ 8/ 2017 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली युनिसेफच्या श्रीमती भारती तहिलीनी, राज्य युनिसेफ सल्लागार यांच्या समवेत बैठक झाली आणि खालील core group तयार करण्यात आला या core group ला एक दिवसाचे MHM प्रशिक्षण देखील देण्यात आले.

**MHM च्या अंमलबजावणीसाठी तयार core group**

| अ.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| 1 | खातेप्रमुख | 10 |
| 2 | तालुका आरोग्य अधिकारी | 10 |
| 3 | बालविकास प्रकल्प अधिकारी | 10 |
| 4 | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | 05 |
| 5 | पाणी स्वच्छता विभाग | 15 |
| 6 | विट्स संस्था | 05 |
| 7 | लुल्ला फाऊंडेशन | 05 |
| 8 | गटशिक्षणाधिकारी | 10 |
| **एकूण** | | **70** |

**संदर्भ -** मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश दिनांक 4/ 8/ 2017

सांगली जिल्ह्यातील एकूण 1133 शाळांतील इ. 6 वी ते 10 वी मधील 84003 मुलींना 3444 प्रशिक्षित महिला प्रशिक्षकांकडून मासिक पाळी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले

**MHM प्रशिक्षणाचे टप्पे**

| अ.क्र | टप्पा क्र. | कालावधी | तपशील |
|---|---|---|---|
| 1 | एक | 13/11/ 2017 ते 16/11/2017 | मास्टर ट्रेनर ची निवड |
| 2 | दोन | | 80 मास्टर ट्रेनर चे प्रशिक्षण |
| 3 | तीन | | 3360 बेस ट्रेनर चे प्रशिक्षण |
| 4 | चार | | 84003 किशोरवयीन मुलींना बेस ट्रेनर मार्फत प्रशिक्षण |

जिल्ह्यातील तयार मास्टर ट्रेनर १) डॉ. अंजली रसाळ २) शिल्पा जाधव ३) मुग्धा अभ्यंकर यांचेमार्फत गडचिरोली,धारवाड, उस्मानाबाद, पुणे, पालघर याठिकाणी जाऊन मासिक पाळी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आले.

**सांगली जिल्ह्यातील MHM प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षकांचा तपशील**

जिल्हास्तरावर मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षणाकरिता प्रवीण प्रशिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आले (30/10/ 2017) प्रवीण प्रशिक्षकांमार्फत 25 मुलींसाठी 1 असे साखळी पद्धतीने गाव स्तरावर महिला साधन व्यक्ती तयार करण्याचे नियोजन केले हा तपशील खालील तक्त्या प्रमाणे

| अ. क्र. | तालुका | शाळांची संख्या | मुलींची संख्या | मास्टर ट्रेनर प्रवीण प्रशिक्षक संख्या प्रति 40 प्रशिक्षक मागे 1 | गावस्तरावरील आवश्यक प्रशिक्षक संख्या प्रति 25 मुलीमागे 1 प्रशिक्षक बेस ट्रेनर | एकूण प्रशिक्षक 5 + 6 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | आटपाडी | 74 | 5771 | 6 | 231 | 237 |
| 2 | जत | 231 | 14855 | 15 | 594 | 609 |
| 3 | कवठे महांकाळ | 48 | 5804 | 5 | 188 | 193 |
| 4 | कडेगाव | 84 | 4690 | 6 | 232 | 238 |
| 5 | खानापूर | 98 | 6448 | 6 | 258 | 264 |
| 6 | मिरज | 147 | 11253 | 11 | 450 | 461 |
| 7 | पलुस | 61 | 5732 | 6 | 229 | 235 |
| 8 | शिराळा | 93 | 5597 | 6 | 224 | 230 |
| 9 | तासगाव | 113 | 8539 | 9 | 342 | 351 |
| 10 | वाळवा | 184 | 15314 | 15 | 613 | 628 |
| **एकूण** | | **1133** | **84003** | **84** | **3360** | **3444** |

**संदर्भ -** पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक 30/ 11/ 2017

| अ.क्र. | तालुका | इ. 6 वी ते 10 वी चेवर्ग | | | | | एकूण | बेस ट्रेनर | मास्टर ट्रेनर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 वी | 7 वी | 8 वी | 9 वी | 10 वी | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | कवठे महांकाळ | 1156 | 1187 | 1149 | 1181 | 1131 | 5804 | 232 | 6 |
| 2 | मिरज | 2349 | 2284 | 2318 | 2252 | 2050 | 11253 | 450 | 11 |
| 3 | खानापूर | 1264 | 1227 | 1307 | 1327 | 1323 | 6448 | 258 | 6 |
| 4 | जत | 3140 | 2951 | 3131 | 3027 | 2606 | 14855 | 594 | 15 |
| 5 | वाळवा | 3004 | 3146 | 3168 | 3073 | 2923 | 15314 | 613 | 15 |
| 6 | पलुस | 1140 | 1200 | 1166 | 1166 | 1060 | 5732 | 229 | 6 |
| 7 | तासगाव | 1661 | 1602 | 1798 | 1762 | 1716 | 8539 | 342 | 9 |
| 8 | शिराळा | 1111 | 1114 | 1115 | 1133 | 1124 | 5597 | 224 | 6 |
| 9 | आटपाडी | 1145 | 1071 | 1263 | 1170 | 1122 | 5771 | 231 | 6 |
| 10 | कडेगाव | 900 | 922 | 985 | 981 | 902 | 4690 | 188 | 5 |
| **एकूण** | | **16870** | **16704** | **17400** | **17072** | **15957** | **84003** | **3360** | **84** |

**सांगली जिल्ह्यातील मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षणासाठी इयत्ता 6 वी ते 10 वी मधील किशोरवयीन मुलींची सांख्यिकीय माहिती**

**संदर्भ -** पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

मासिक पाळी व्यवस्थापन या विषयाबाबत डी. एल. एड. च्या छात्राध्यापिकांना प्रशिक्षण देण्यासाठी अध्यापक विद्यालयातील 35 महिला अध्यापकाचार्य व प्राचार्य यांना दिनांक 16/11/2019 रोजी प्रशिक्षण देण्यात आले. यानुसार दिनांक 18 /11/ 2019 ते 10 /12 / 2019 या कालावधीत अध्यापक विद्यालय स्तरावर प्रशिक्षण पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापिकांची सांख्यिकीय माहिती**

| अ.क्र. | तालुका | प्रथम वर्ष छात्राध्यापिका | द्वितीय वर्ष छात्राध्यापिका | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | मिरज | 76 | 55 | 131 |
| 2 | तासगाव | 28 | 22 | 50 |
| 3 | कवठेमहांकाळ | 12 | 8 | 20 |
| 4 | आटपाडी | 54 | 47 | 101 |
| 5 | खानापूर | 34 | 21 | 55 |
| 6 | वाळवा | 47 | 42 | 89 |
| 7 | शिराळा | 2 | 6 | 08 |
| | एकूण | 253 | 201 | 454 |

**संदर्भ -** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सांगली दिनांक 16/ 11/ 2019




**विना अर्थसाहाय्य मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षण दिलेल्या जिल्ह्यांचीसांख्यिकीय माहिती**

| अ.क्र. | जिल्हा | प्रशिक्षण घेतलेल्या महिलांची संख्या |
|---|---|---|
| 1 | मुंबई | 170 |
| 2 | नाशिक | 42 |
| 3 | अमरावती | 93 |
| 4 | नागपूर | 50 |
| 5 | भंडारा | 30 |
| 6 | गडचिरोली | 61 |
| 7 | पुणे | 135 |
| 8 | पालघर | 63 |
| 9 | रायगड | 56 |
| 10 | ठाणे | 183 |
| 11 | जळगाव | 50 |
| 12 | धुळे | 56 |
| | एकूण | **989** |

**संदर्भ –** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे [ समता विभाग ]

5. **मासिक पाळी व्यवस्थापनात शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने -** ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणातील व आरोग्यविषयक अडचणी यांबाबत फार कमी बोलले जाते. मुलींच्या शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून सर्व शिक्षा अभियानांतर्गत मुलींना उपस्थिती भत्ता,सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, मोफत गणवेश, मोफत पाठ्यपुस्तके ,सावित्रीबाई फुले मागासवर्गीय शिष्यवृत्ती योजना ,विद्यावेतन, शाळेत जाण्यासाठी राजमाता जिजाऊ मोफत सायकल योजना, अहिल्याबाई होळकर बस पास योजना, कस्तुरबा गांधी बालिका निवासी विद्यालय, लेक वाचवा लेक शिकवा यांसारख्या अनेक माध्यमातून मुलींच्या शिक्षणासाठी शासन स्तरावरून प्रयत्न सुरू आहेत. तरीदेखीलमुलींच्या शिक्षणात अनेक अडथळे दिसून येतात. अशावेळी शालेय नेतृत्वाला अपेक्षित शैक्षणिक यश प्राप्त होण्यासाठीअनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.
**मासिक पाळी व्यवस्थापनात शालेय नेतृत्वापुढे अनेक आव्हाने आहेत ती पुढील प्रमाणे:-**

- **किशोरवयीन मुलींशी संबंधित आव्हाने:-** **१]** मासिक पाळी व्यवस्थापन शालेय नेतृत्वाला अवगत नसते. मुली हा विषय उघडपणे बोलू शकत नाहीत. मुलींच्या अबोल राहण्यामुळे मासिक पाळी व्यवस्थापनात शालेय नेतृत्वासमोर एक आव्हान असते. **२]**मासिक पाळी दर महिन्याला येणारी एक शारीरिक घटना आहे. त्यामुळे महिन्यातील चार- चार दिवस विद्यार्थिनी अनुपस्थित राहतात. मुलींना शाळेत आणणे व टिकवून ठेवणे हे नेतृत्वापुढे आव्हान असते. **३]**किशोरवयीन मुलींच्या अनुपस्थितीमुळे विषय निहाय अपेक्षित अध्ययन निष्पत्तीची पूर्तता करण्याचे आव्हान नेतृत्वापुढे असते. ४ ]मुलींच्या शिक्षणासाठी आजच्या स्पर्धात्मक युगात आवश्यक असलेले पूरक वातावरण निर्माण करणे व टिकविणे हे शालेय नेतृत्वापुढे एक आव्हान असते.
- **शिक्षकांशी संबंधित आव्हाने:- १]** मासिक पाळी व्यवस्थापन करण्याची शिक्षकांची मानसिकता नसते ,त्यामुळे शालेय नेतृत्वाला आपल्या महिला सहकाऱ्यांचे सहकार्य मिळत नाही. त्यांची मानसिकता बदलून त्यांना सतत कार्यप्रवण ठेवण्यासाठी प्रेरणा देणे हे शालेय नेतृत्वासाठी मोठे आव्हान आहे. **२]**मासिक पाळी व्यवस्थापन करताना शाळेतील शिक्षकांना मुलींशी,मुलींच्या मातांशी संवाद साधणे आवश्यक ठरते. माता-पालक मेळावे ,बैठका घेणे, व त्यात मुलींच्या आरोग्यविषयक समस्यांवर चर्चा करणे यांकडे शिक्षकांकडून दुर्लक्ष होते हे नेतृत्वापुढे एक आव्हान ठरते.
- **पालकांशी संबंधित आव्हाने:- १]** वयात आलेल्या मुलींच्या सुरक्षिततेविषयी पालकांना काळजी वाटते. पालकांचा दृष्टिकोन बदलणे हे शालेय नेतृत्वापुढे एक आव्हान असते. **२]** ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाविषयी पालकांची अनास्था असते. पालक मुलींच्या अभ्यासाकडे लक्ष देत नाहीत. मुलींचे शिक्षण पूर्ण व्हायच्या आत विवाह लावून देण्याकडे पालकांचा कल असतो. शालेय नेतृत्वापुढे पालकांचे मतपरिवर्तन करून मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवणे हे आव्हान ठरते.
- **समाजाशी संबंधित आव्हाने:- १]** मासिक पाळी व्यवस्थापन जागरूकतेसाठी समाजाचा सहभाग मिळविणे शक्य होत नाही. **२]**मासिक पाळी संदर्भात आजही समाजामध्ये अनिष्ट रूढी, परंपरांचा पगडा, समज-गैरसमज दिसून येतात. मुलींच्या शिक्षणाबाबत अनास्था दिसून येते. लोकांकडून शाळेला अपेक्षित सहकार्य मिळत नाही. अशावेळी शालेय नेतृत्वाला गुणवत्तापूर्ण काम करणे हे एक आव्हान असते.

6. **मासिक पाळी व्यवस्थापनात यशस्वी शालेय नेतृत्वाचा अभ्यास :-** शालेय नेतृत्वाला मासिक पाळी व्यवस्थापन करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.अशा प्रतिकूल परिस्थितीत आपल्या नेतृत्वाचा यथायोग्य वापर करून मुख्याध्यापक व शिक्षक आपली शाळा यशोशिखरावर घेऊन जाण्यात यशस्वी होताना दिसून येतात. महाराष्ट्रातील 'मासिक पाळी व्यवस्थापन' कार्यात अशा यशस्वी शालेय नेतृत्वाची यशोगाथा आपण अभ्यासणार आहोत, अनेक अडथळे पार करीत त्यांनी केलेला प्रवास खरोखरच प्रेरणादायी आहे .यातून प्रेरणा घेऊन आपणही आपले नेतृत्व विकसित करून आपली शाळा प्रगतीपथावरघेऊनजाण्यास कृतिप्रवण व्हाल ही अपेक्षा आहे.

❖ **मुख्याध्यापक यशोगाथा:-**

**मुख्याध्यापकांचे नाव:-** श्री दादासो नरसगोंडा पाटील. **शाळा** :-अजितराव घोरपडे विद्यालय, कळंबी. **तालुका:** मिरज, **जिल्हा:** सांगली.

श्री. दादासो पाटील 2010 साली मुख्याध्यापक या पदावर शाळेत रुजू झाले , शाळेची पटसंख्या 320 होती. गावाची लोकसंख्या 3000, 100% शेतकरी व्यवसाय असलेले गाव. घरात अगदी लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सगळयांना शेती कामाचा भार उचलणे क्रमप्राप्त असते, शाळेत इयत्ता सहावी ते दहावीच्या किशोरवयीन मुलींची संख्या 265 आहे. मासिक पाळी दरम्यान मुली महिन्यातून चार दिवस गैरहजर राहत असत .शाळेत मुली गैरहजर राहतात म्हणून स्वतः मुख्याध्यापकांनी पालकांशी संवाद साधला. पुरुष पालक या विषयावर बोलायला तयार नव्हते. श्री .पाटील यांनी शाळेतील महिला शिक्षकांची मदत घेतली. माता पालकांशी संपर्क साधून संवाद साधला. माता पालकांशी संवाद साधायला देखील अगदी सकाळची वेळ गाठावी लागत होती, कारण घरातील कामे आवरून या माता शेतीच्या कामासाठी लवकर बाहेर पडतात.सकाळी गृहभेटी देऊन किशोरवयीन मुलींना मासिक पाळी दरम्यान शाळेत पाठविण्यासाठी आग्रह धरणे हे एक अत्यंत आव्हानात्मक काम होते .सर्वप्रथम श्री. पाटील यांनी शाळेतील एक उत्साही शिक्षिका सौ. स्वाती संजय पाटील यांना मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षण घेण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमध्ये पाठविले. त्यांना प्रशिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळे श्री. पाटील सरांच्यासह महिला शिक्षकांना पालकांची संवाद साधण्याचे कौशल्य प्राप्त झाले. मासिक पाळी दरम्यान इयत्ता सहावी ते दहावीच्या मुली शाळेत अनुपस्थित का राहतात? मुलींची अनुपस्थित राहण्याची कारणे याशिवाय कोणकोणती आहेत?यासाठी एक पडताळा सूची बनविली .सर्वेक्षण केले. त्याची घरनिहाय यादी बनविली आणि दररोज सकाळी महिला शिक्षिकांना गृहभेटीसाठी पाठविले .सुरुवातीला माता

पालकांनी फारसा समाधानकारक प्रतिसाद दिला नाही. मात्र दररोज या महिला शिक्षिका येतात, संवाद साधतात ,घरातील महिला वृद्धांची तसेच आपल्या मुलीची आपुलकीने चौकशी करतात, तसेच मासिक पाळी सुरू असलेल्या मुलींना पॅड पुरविण्याचे काम करतात, शाळेमध्ये किशोरवयीन मुलींनी मासिक पाळी व्यवस्थापन कशा प्रकारे करायला हवे, हे अगदी खेळीमेळीच्या वातावरणात सांगत असल्यामुळे माता पालक व मासिक पाळी दरम्यान गैरहजर राहणाऱ्या मुलींशी शिक्षकांचे आपुलकी आणि जिव्हाळाचे संबंध निर्माण होण्यास सुरुवात झाली. श्री.पाटील सरांनीतर केंद्र, तालुका आणि जिल्हा स्तरावर होणाऱ्या सर्व बैठकांमध्ये सक्रिय सहभाग घेतलेला होता, त्यांना मासिक पाळी व्यवस्थापनाविषयी सर्व माहिती मिळाली. स्वतः मुख्याध्यापक या विषयाबाबत जागरूक आहेत ही बाब आदर व विश्वासास पात्र ठरली . श्री.पाटील सरांनी शाळेमध्ये माता पालकांच्या बैठकीचे आयोजन केले. महिलाविषयक कार्यक्रमांतून स्वतः महिला शिक्षकांनी प्रबोधन केले. त्यात मासिक पाळी या विषयाबाबत सखोल माहिती दिली, परंतु महिला पालक दबक्या आवाजात शालेय स्वच्छतागृह, पाणी सुविधा, पॅड बदलण्यासाठी ची गैरसोय, कापड किंवा पॅड च्या शाळेतील भावाबाबत चर्चा करू लागल्या. नेमकी ही चर्चा श्री पाटील यांच्या पुढील दिशेला मार्गदर्शक ठरली. श्री. पाटील सरांनी किशोरवयीन मुलींना मासिक पाळी दरम्यान पुरवावयाच्या सर्व सुविधांची यादी शाळेतील महिला शिक्षकांच्या मदतीने तयार केली .शाळेतील सर्वच महिला शिक्षिकांनी आवर्जून सहभाग नोंदवला. मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षणात सांगितलेल्या सुविधांबाबत श्री. पाटील यांना सजग केले.सरांनी समाजाचा सहभाग घेऊन स्वतःच्या खर्चातून खालील बाबींची पूर्तता केली.







**चेंजिंग रूमची व्यवस्था-** सुमारे 300 किशोरवयीन मुलींसाठी चेंजिंग रूम तयार केलीआहे.या रूममध्ये टॉवेल, साबण, पॅड, पाणीआणि इन्सिनरेटरचीव्यवस्था केली आहे.

- **इन्सिनरेटरची उपलब्धता-**हे शोषक साहित्य मिळविण्यासाठी मिरजेतील डॉ. कदम मॅडम यांनी10000/- ची देणगी दिली व स्वतः श्री. पाटील यांचे10000 /- असे 20000/- चे इन्सिनरेटरशाळेला उपलब्ध करून दिले
- **मुलींचे स्वच्छतागृह व पाण्याची व्यवस्था -** स्वच्छ विद्यालय उपक्रमांतर्गतशाळेत4000 लिटरच्या 2 टाक्या बसविल्या आहेत. मुलींच्या स्वच्छतागृहासाठी 2000 लिटरची पाण्याची टाकी उपलब्ध आहे. एचटीपी मशीन बसविली आहे. पाण्याच्या प्रेशरमुळे स्वच्छतागृहतील स्वच्छता राखली जाते. मुबलक पाण्यासाठी शाळेत बोअरवेल देखील आहे बोअरवेललादेखील सबमशीन पंप बसविला आहे.
- **रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम** –छतावरील पाण्याच्या पुनर्भरणासाठी.
- **हँडवॉश स्टेशन**– 25 मुली मागे 01 अशा75 हँडवॉश स्टेशन ची व्यवस्था शाळेत आहे.
- **दामिनी पथक -**मुलींनी स्वतःचे संरक्षण कशा प्रकारे करावे यासाठी यामार्फत मार्गदर्शन दिले जाते
- **निर्भया पथक**– मुलींची छेडछाड होऊ नये, मुलींना संरक्षण मिळावे म्हणून निर्भया पथक मुलींचा आत्मविश्वास वाढविते.
- **गृहभेट -**शाळेतील शिक्षिका गृहभेटी करूनमाता पालकांना मार्गदर्शन करतात.
- **फोनवर संवाद** -किशोरवयीन मुलींच्या माता व मुली यांच्याशी फोन संवाद घडवून आणला जातो.
- **आरोग्य तपासणी -**मुलींचीHB तपासणी केली जाते. लोहयुक्त गोळ्यांचे वाटप आरोग्य सेविकेच्या मार्फत करण्यात येते.
- **सखी सोबती –** किशोरवयीन मुली त्यांच्या घरी सुरक्षित पोहोचण्यासाठी मुलींच्या जोड्या लावण्यात आलेल्याआहेत. या
- मुली एकमेकींना घरापर्यंत सुरक्षित पोहोचण्यासाठी मदत करतात.
- **पथनाट्य गाणी नाटिका -** मासिक पाळी व्यवस्थापन जागृतीसाठी मुली पथनाट्य आणि नाटिका यांच्यामदतीने प्रबोधन करतात.

❖ **स्वतंत्र तक्रार पेटी** – किशोर वयीन मुलींना स्वतंत्र तक्रार पेटीच्या माध्यमातून शंकासमाधान व समुपदेशनकेले जाते.

❖ **पालक बैठका** -दरवर्षी शाळेत एकूण 4 बैठका घेतल्या जातात. त्यात 2 बैठका पुरुष पालकांसाठी व 2 बैठका मातापालकांसाठी असतात.

❖ **SMC/SMDC बैठका-** दोन महिन्यांतून एकदा या बैठका होतात.

❖ **शाळेतील अन्य गुणवत्तापूर्ण कार्यक्रमांचा अहवाल खालील प्रमाणे आहे–**

➢ इयत्ता पाचवी ते दहावी साठी गणित, इंग्रजी अभियान राबविले जाते यात विद्यार्थ्यांच्या गणित व इंग्रजी विषयसुधारणांवर भर दिला जातो.

➢ अध्ययन अक्षम मुलांसाठी वाचन लेखन वर्ग घेतले जातात.

➢ अक्षर सुधार कार्यक्रम घेतला जातो. यात भाषा शिक्षक व चित्रकलेचे शिक्षक प्राधान्याने सहभागी होतात.

➢ सहाध्यायी गटाचा स्वाध्याय पूर्ण करण्यासाठी मध्यम सामान्य आणि कच्चे यांचा सह अध्याय गट तयार केला जातो. ही मुले एकमेकांच्या मदतीने आपले स्वाध्याय पूर्ण करतात.

➢ श्रेणीवाढ कार्यक्रमांतर्गत इयत्ता पाचवी ते दहावीच्या मुलांसाठी त्यांच्या श्रेणीत वाढ होण्याच्या दृष्टीने आधी विद्यार्थ्यांना शाळेत बोलतात आणि त्यांची श्रेणीसुधार होण्यासाठी प्रयत्न करतात, याचा परिणाम असा झाला आहे की ,एकही विद्यार्थी खासगी शिकवणीला जात नाही.

➢ साप्ताहिक सराव चाचणी घेतली जाते, यामुळे मुले अभ्यासात अपडेट राहतात.

➢ 100 टक्केनिकालाचीपरंपरा - 2010 ते 2020 या दहा वर्षांत शाळेने इयत्ता दहावीच्या निकालाची परंपरा कायम राखली आहे.

आज शाळेत गावातील व जवळपासच्या अकरा गावांतील739मुले आहेत. ही मुले मिरज बाह्य, कळंबी, सिद्धेवाडी, मालगाव, तानंग, कुपवाड, पारगाव, खामकरवस्ती, सोनी, भोसे, शिंदेवस्ती या पंचक्रोशीतील आहेत. ही मुले पायी चालत, बसने, सायकलने व पालकांबरोबर येतात. इतरगावांमध्ये शाळेच्या सुविधा असतानादेखील पालक आणि विद्यार्थी श्री. पाटील सरांच्या हायस्कूलकडे आकर्षित होतात, ही शाळा मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी कटिबद्ध आहे.300 मुलांचे पालकत्व स्वीकारणारे श्री. पाटील हे पालक बैठकांमध्ये पालकांना भावनिक आवाहन करतात.शाळेच्या आत आलेली प्रत्येक मुलगी ही आमचीच मुलगी आहे अशी भावनिक साद घालतात. मुलगी शाळेतून घरी जाईपर्यंत आता ही माझी जबाबदारी आहे असा विश्वास पालकांना देतात.मुलींना,'तू चुकू नकोस पण तुला कोणी त्रास देत असेल तर आम्ही तुझ्या पाठीशी आहोत'. असा धीर देखील देतात.आदर्शवत शाळेचा नावलौकिक सांगली जिल्ह्यात आहे. शाळेला यश मिळवून देऊन शालेय नेतृत्व सिद्ध करणाऱ्या श्री. पाटील यांचे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे.




● **मासिक पाळी व्यवस्थापनजिल्हा नेतृत्वाची भूमिका-**

'मासिक पाळी हा विषय प्रायव्हेट असू शकतो सीक्रेट नाही'हे मा. डॉ. अभिजित राऊत (मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली)यांचे विधान कानावर पडताच मासिक पाळीविषयी असलेला संकोच,न्यूनगंड सैलहोण्यास मदत झाली. निमित्त होतं, जिल्हा परिषद सभागृहात आयोजित केलेल्या मासिक पाळी व्यवस्थापनसभेचं. डॉ. अभिजित राऊत यांनी सांगली जिल्हा परिषदेत सीईओ म्हणून पदभार स्वीकारताच अनेक कामांना/विषयांना गती दिली त्यातील एक संवेदनशील काम म्हणजे मासिक पाळी व्यवस्थापन होय.प्रशासकीय नेतृत्व करताना या नेतृत्वाला मासिक पाळी व्यवस्थापन या उपक्रमाची अंमलबजावणी करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. अगदी रविवार सुट्टीचा दिवस असून देखील, पूर्णवेळ उपस्थित राहून या विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच त्यांनी बदलून टाकला आहे. प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या प्रशासकीय नेतृत्वाचा यथायोग्य वापर करुन डॉ. राऊत सांगली जिल्ह्याला यशोशिखरावर घेऊन जाण्यात यशस्वी झाले.

● **सांगली जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मासिक पाळी व्यवस्थापनात केलेला कामकाजाचा अहवाल-**

मासिकपाळी व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणीकरताना, जिल्हा परिषदेतील सर्व विभागातील प्रमुखांना, अशासकीय संस्था, एनजीओ संस्था यांना एकत्रित आणून मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षण चार टप्प्यांत देण्यासाठी प्रयत्न केले याकरिता जिल्हा परिषदेतील पाणी स्वच्छता विभागाने केलेल्या अचूक नियोजनाचा फायदा झाला.

❖ **जागतिक मासिक पाळी दिनाचे आयोजन -**

28मे हा जागतिक मासिक पाळी दिन. या दिवसाचे औचित्य साधून मासिक पाळीव्यवस्थापन प्रशिक्षणाच्या उजळणी कार्यशाळेचे आयोजन केले.(2017-18)तसेच चालू वर्षी कोरोना काळात सर्व महिलांना एकत्रित आणणे शक्य नव्हते म्हणून 28 मे 2020 रोजी Onlinefacebook live कार्यक्रम घेतला.

❖ **सांगली जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना इंसुलेटर चे वाटप केले.**

❖ **आरोग्यसखी** - सांगली जिल्ह्यातील प्रत्येक माध्यमिक शाळेतील इयत्ता सहावी ते दहावी मधील2 मुलींना डॉक्टर राऊत यांनी आमंत्रित केले. जवळपास 800 मुलींनी या उपक्रमात सहभाग घेतला.

❖ **पूरस्थितीतीलभरीवकाम**– पूरस्थितीत स्थलांतरित झालेल्या मुलीव महिलांसाठीपरकर इनर वेअर पॅडचे वाटप करण्यासाठी प्रयत्न केले तसेच मास्टर ट्रेनर च्या मदतीने मासिक पाळी दरम्यान घ्यावयाची काळजी , स्वच्छतायांबाबत मार्गदर्शन केले.

❖ **कोरोना योद्धाम्हणूनकाम** – कोरोनाच्या काळात बाहेरील जिल्ह्यातून येणाऱ्या लोकांना साधारणपणे 14 दिवस संस्थात्मक विलगीकरणातठेवले जात होते,या काळात महिलांना किशोरवयीन मुलींसाठीसॅनिटरी पॅड चे वाटप करण्यात आले.

❖ **मास्टर ट्रेनरचा उपयोग अन्य जिल्ह्यांसाठी** –गडचिरोली, कोल्हापूर, उस्मानाबाद, पालघर, पुणे इत्यादी जिल्ह्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मागणीनुसार सांगली जिल्ह्यातील मास्टर ट्रेनर ना मासिक पाळी व्यवस्थापनाचेप्रशिक्षणदेण्यासाठीउपरोक्तजिल्ह्यांमध्येपाठविले.

❖ **९५०० अल्प बचत महिला गट व अंगणवाडी सेविकांच्या कार्यशाळा घेतल्या**

एक कर्तव्यदक्ष कार्यतत्पर अधिकारी म्हणून सांगली जिल्ह्यात अनेक प्रशासकीय कामाबरोबरच, अत्यंत संवेदनशील विषयांची हाताळणी डॉ. राऊत यांनी केली आणि सांगलीकरांचा मासिक पाळी बददलचा दृष्टिकोनच बदलून टाकला. प्रभावी, परिणामकारक नेतृत्व सिद्ध करणाऱ्या डॉ. राऊत यांचे कार्य मोलाचे आणि प्रेरणादायीआहे.



**7. चला तर, चिंतनात्मक प्रश्नावर थोडा विचार करू या -**

१. मासिक पाळी दरम्यान शाळेत अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थिनींबाबत श्री पाटील सरांना आलेल्या समस्यांची यादी करा.

२. श्री पाटील यांच्या यशाबद्दल आपण कोणता अभिप्राय द्याल?

३. श्री पाटील सरांनी शाळेत घडवून आणलेल्या बदलांची यादी करा

४.मासिक पाळी व्यवस्थापनात शाळांमध्ये कोणत्या नेतृत्व कौशल्यांची गरज आहे असे आपणांस वाटते?

५. मासिक पाळी व्यवस्थापनात काम करण्याची संधी तुम्हांला प्राप्त झाली तर तुमच्या कामाचे स्वरूप कसे असेल ते थोडक्यात लिहा.

**8. थोडासा विचार, थोडीशी चर्चा करू या!**

१. किशोर वयीन मुली वयात आल्यानंतर महिन्यातून दोन ते चार दिवस शाळेत अनुपस्थित राहतात. अशावेळी कुटुंबात देखील मुलींच्या शाळेत हजर राहण्याविषयी किंवा शिक्षणा विषयी कमालीची अनास्या दिसून येते त्यामुळे संपादणूक पातळी गाठताना अडचणी येतात अशा शाळेच्या ठिकाणी बदलीने रुजू झाल्यास आपण काय कराल?

२. ग्रामीण भागातील उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक शाळेत इयत्ता सातवी ते दहावीच्या किशोरवयीन मुली मासिक पाळी दरम्यान शाळेत अनुपस्थित राहतात. अशा मुली, शाळेत नियमित उपस्थित रहाव्यात, शिक्षणाच्या प्रवाहात त्यांचे सातत्य टिकून राहावे यादृष्टीने आपण मुख्याध्यापक महणून कोणते उपाय योजाल?

**9. शाळा विकास आराखडा नियोजन** –

आपण कार्यरत असलेल्या शाळेची सद्य:स्थिती लक्षात घेऊन, शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी एक वर्षाचा शाळा आराखडा तयार करा.

**मासिक पाळी व्यवस्थापन संदर्भात काम करीत असताना असेही करता येईल**....

➢ शाळेत येणाऱ्या इयत्ता सहावी ते दहावी मधील किशोरवयीन मुलींची वैयक्तिक माहिती,आरोग्य विषयक माहिती तसेच कौटुंबिक पार्श्वभूमी ची माहिती "कळी उमलताना"अशा शीर्षकासह रजिस्टर मध्ये नोंद करता येईल.

➢ मासिक पाळी दरम्यान अनुपस्थित राहणाऱ्या व न राहणाऱ्या विद्यार्थिनी असे वर्गीकरण करता येईल

➢ शाळेत व नियमित असणाऱ्या किशोरवयीन मुलींबाबत शाळा व्यवस्थापन समितीस अवगत करता येईल

➢ शाळेतील अनियमितता दूर करण्यासाठी गृहभेटींचेआयोजन करता येईल

➢ गृहभेटींनंतरमाता-पालक मेळावे,पालक मेळावे, माता पालक बैठक ,महिला सबलीकरणावर आधारित कार्यक्रम यांचे आयोजन करता येईल.

➢ मासिक पाळी व्यवस्थापनाबाबत शाळेतील महिला शिक्षिका, मुख्याध्यापक यांनाSMC/SMDCसमिती, ग्रामस्थ आणि पालक यांच्याशी संवाद साधता येईल.

➢ 'मासिक पाळी व्यवस्थापन मार्गदर्शक पुस्तिका'या मधील सत्रांचा वापर करून या विषयाबाबतचा दृष्टिकोनबदलता येईल.

➢ इयत्ता आठवी शिष्यवृत्तीतआणि इयत्ता दहावी मध्ये विशेष प्रावीण्य संपादन करणाऱ्या किशोरवयीन मुलींचा व माता पालकांचा सत्कार करता येईल.

➢ SMC/SMDC, सामाजिक संस्था,पालक,ग्रामस्थ, गावातील इतर क्षेत्रात काम करणारे शासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्याशी सहकार्याचे संबंध प्रस्थापित करता येतील.

**10. मासिक पाळी व्यवस्थापनासंदर्भात शासकीय योजना:-**

१. स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय ,राष्ट्रीय अभियान सप्टेंबर 2014च्या मार्गदर्शिका नुसार मासिक पाळी व्यवस्थापन हा अभियानाचा अविभाज्य भागम्हणूनयाकडे लक्ष वेधले आहे.

२. यानुसार 27 ऑक्टोबर 2017 च्या परिपत्रकानुसार शाळा स्तरावर मासिक पाळी व्यवस्थापन व स्वच्छतेच्या सवयीबाबत सूचना दिल्या आहेत.

३. मासिक पाळी व्यवस्थापन उपक्रमाची शाळा स्तरावर प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणून जिल्हा स्तरावर टास्क फोर्स ची रचना करण्यात आली.

४. यानुसार राज्यस्तरीय प्रशिक्षण, जिल्हा व तालुकास्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

५. सध्या शाळेत कार्यरत असणारे उपक्रम मीना राजू मंच ,किशोरी मंच यांना देखील या कार्यक्रमातसहभागीकरून देण्याच्या सूचना करण्यात आल्या.

**11. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने मुलींच्या संदर्भात केलेला विचार:-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या आढावा घेतला असता विद्यार्थिनींच्या दृष्टीने शालेय शिक्षणाच्या महत्वाच्याउद्दिष्टांपैकी खालील महत्त्वाची उद्दिष्टे, तत्वे दिलेली आहेत.सर्व स्तरांवरील शिक्षणामध्ये सर्वांना वैश्विक प्रवेश व त्यांना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवणे सन 2030 पर्यंत 3 ते 18 वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीच्या दर्जेदार शालेय शिक्षणात प्रवेश मिळवून देऊनशिक्षणामध्ये त्यांचा सहभाग घेणे.

- विद्यार्थ्यांच्या अशैक्षणिक व शैक्षणिक क्षेत्रांतील सर्वांगीण विकासास चालना देण्यासाठी तसेच बालकांना, पालकांना संवेदनशील बनवू प्रत्येक विद्यार्थ्याची अद्वितीय क्षमता शोधणे आणि वृदधिंगत करणे.

- सन 2030 पर्यंत विविध उपाय योजनांच्या माध्यमातून प्राथमिकशाळेपासून माध्यमिक शिक्षणापर्यंत 100% पटनोंदणी साध्य करायची आहे.

- शाळेतील मुलांच्या भरतीच्या संख्येत वाढ करणे, ज्या ठिकाणी शालेय सेवा आजवर देता आली नाही किंवा कमी प्रमाणात उपलब्ध आहे अशा ठिकाणी नवीन सुविधा विकसित करणे आणि सर्व विद्यार्थ्यांसाठी, विशेषतः मुलींसाठी संपूर्ण सुरक्षेची हमी देऊन शाळेत ये-जा करण्यासाठी दळणवळण सेवा व वसतिगृहाची सेवा आवश्यकतेनुसार उपलब्ध करून देणे अशा उपाययोजनांमधून शालेय प्रवेशाची दरी कमी करण्याचा मानस आहे.

- शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलांच्या दैनंदिन उपस्थितीचा व अध्ययन निष्पत्तीचा आढावा घेणे तसेच शिक्षक, समाजसेवक व स्वयंसेवी संस्थायांच्यामार्फत शाळेतून गळती होणाऱ्या व शाळेत न येणाऱ्या मुलांच्या संख्येवर लक्ष ठेवले जाईल, औपचारिक व अनौपचारिक

शैक्षणिक माध्यमातून अध्ययनाचे वेगवेगळे मार्ग उपलब्ध करून दिले जातील आणि सोबतच खुले शालेय शिक्षण (ओपन स्कूलींग)वदूरस्थशिक्षण  (डिस्टन्स स्कूलींग) व तंत्रज्ञान वापरण्याची साधने यांचे सबलीकरण करण्यात येईल.

● जर आरोग्यविषयक कारणास्तव विद्यार्थी शाळेत उपस्थित राहू शकत नसतील, तर त्यांनी त्वरित शाळेत उपस्थित होण्यास आवश्यक असलेल्या उपाययोजना करण्यात येतील. त्या मध्ये शाळेत आरोग्य  सेवकांची नेमणूक करणे तसेच या विषयी विद्यार्थी पालक व व्यापक प्रमाणावर समाजामध्ये जनजागृती करणे आणि त्यांचा योग्य आरोग्य सेवांशीसंपर्क करून देणे या बाबींचा समावेश होतो.

● 2030 पर्यंत सर्व लिंगाच्या व सामाजिक वर्गवारी च्या सर्व भागांमध्ये समानता असावी या उददेशाने एक सर्वसमावेशक व न्याय्य शिक्षण प्रणाली अस्तित्वात आणणे.

● वंचितगटातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या विकसित केल्या जातील.

● शहरी भागातील गरीब कुटुंबांमधील विद्यार्थ्यांना योग्य जीवनमान मिळावे यासाठी त्यांना शिक्षण देणे.  दिव्यांग मुली तसेच तृतीयपंथी मुलांना शिक्षण देणे.

**12. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (NEP 2020)निर्देशित केलेल्या शिफारसी**

- मुलींसाठी त्यांना शाळेपर्यंत पोहोचविण्याची सुरक्षित व्यवस्था किंवा वसतिगृहांची व्यवस्था केली जाईल.
- सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे अनेक मार्ग उपलब्ध होतील.
- समग्र शिक्षा अंतर्गत स्वयंसेवक प्रशिक्षित आणि पात्र सामाजिक कार्यकर्ते शासनाने तयार केलेल्या साहित्य तंत्राद्वारे जोडले जातील.

**13. NEP 2020 च्या अनुषंगाने मोड्यूल संदर्भात मुलींचे शिक्षण:**

● उपेक्षित, वंचित विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे .शिक्षण हे समता सुनिश्चित करण्याचे उत्तम माध्यम आहे. ज्याद्वारे समाजात समानता, समावेशकता आणि सामाजिक-आर्थिक गतिशीलता येऊ शकते , यादृष्टीने NEP2020 मधील भाग -1 च्या प्रकरण 6 मध्ये समन्यायी आणि सर्वसमावेशक शिक्षण सर्वांसाठीचा समावेश करण्यात आला आहे.

● सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या वंचित गटातील(SEDGs) मुलींचा त्यांच्या भविष्यातील पिढ्यांचा शैक्षणिक स्तर उंचावणे.

● सर्व मुलींना गुणवत्तापूर्ण आणि न्यायसंगत शिक्षण प्रदान करणे.

● लिंग समभाव निधीची स्थापना.

● महिलांच्या शिक्षणाची सुनिश्चितता आणि प्रवेश यासाठी महत्त्वपूर्ण तरतूद.

● मुलींच्या वसतिगृहात सुरक्षिततेच्या सर्व उपाययोजना.

● कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (KGBV)चे सक्षमीकरण व विस्तारीकरण.

● शिष्यवृत्ती व इतर संधी योजना एकल एजन्सी आणि वेबसाईट द्वारे घोषितकरणे.

● एक खिडकी प्रणालीतून मुलींना माहिती देणे, अर्ज भरून घेणे.

अशाप्रकारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये वरील मुद्द्यांनुसार विचार करण्यात आला, जेणेकरून किशोरवयीन मुली व प्रशासकीय यंत्रणा शाळा निश्चितच अधिक सक्षम होते.

**14. मासिक पाळी व्यवस्थापन आणि शालेय नेतृत्वाची भूमिका या मोड्यूलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून उपयुक्तता:-**

27 ऑक्टोबर 2017 च्या शासन स्तरावरील मासिक पाळी व्यवस्थापन व स्वच्छतेच्या सवयींबाबत चे शासन परिपत्रक व 3 मार्च 2017 च्या आयुक्त शालेय शिक्षण यांच्या आदेशानुसार, महाराष्ट्रातील शालेय शिक्षणात अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर काम करण्यात आले. ज्यात मासिक पाळी व्यवस्थापन ची माहिती देणे. या विषयीचा संकोच दूर करणे, वेगवेगळया सत्रांचे आयोजन करून मासिक पाळी एक शारीरिक घटना  आहे, अशी जागृती केल्यामुळे  शाळेत नियमित उपस्थित राहण्याबाबत चा दृष्टिकोन विकसित झाला. या विषयावर व्यापक प्रमाणात जागृती व्हावी याकरिता राज्य स्तरावरून समता विभागांतर्गत शिक्षण विभागातील डाएटच्या  महिला अधिकारी, प्राथमिक ,माध्यमिक शिक्षिका महिला विषय साधन व्यक्ती यांना प्रशिक्षित करण्यात  आले.या सर्व अभ्यासातून मोडूल ची निर्मिती झाली.याचा फायदा नक्कीच शैक्षणिक नेतृत्व विकासाच्या वाटचालीस होईल.

● 'स्वच्छ महाराष्ट्र स्वच्छ विद्यालय'ची यशस्वी अंमलबजावणी.

● मासिक पाळी दरम्यान येणाऱ्या समस्यांचे पृथक्करण, वर्गीकरण, विश्लेषण करून समस्येची सोडवणूक.

● मीना राजू मंच, किशोरी मंच या मुलींविषयक कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी.

**समारोप:-**

शिक्षण क्षेत्रात काम करताना अनेक विपरीत व प्रतिकूल परिस्थितीतून नेतृत्वाला मार्ग काढावा लागतो. विद्यार्थ्यांना शाळेत आणणे, शिकविणे आणि टिकविणे, त्याच बरोबर गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे सामर्थ्य सक्षम नेतृत्वाकडे असते.शाळेचा नेता म्हणून काम करीत असताना शालेय नेतृत्व विकसित होत असते.यात नियोजन , व्यवस्थापन आणि प्रशासन तसेच स्वयंविकास, अन्य शालेय घटकांचा विकास, भागीदारी, संघ बांधणी यातील भूमिका व जबाबदारी यांचा समावेश होतो. नेता हा अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावीव परिणामकारक होण्यासाठी तसेच प्रत्येक विद्यार्थ्याचीअपेक्षित संपादणूक गाठण्यासाठी सहकाऱ्यांना प्रेरणा देतो. आपल्या कार्यक्षेत्रात स्वतःच्या उदाहरणातून शालेय नेतृत्वाचा आदर्श निर्माण करतो. सांगली जिल्ह्यात ग्रामीण भागातील शाळेत किशोरवयीन मुलींसाठी काम करणाऱ्या श्री. पाटील यांच्यासारखे अनेक मुख्याध्यापक व शिक्षक कार्यरत आहेत.या सर्वांच्या कार्याच्या अभ्यासातून किशोरवयीन मुलींच्या आरोग्यासाठी व शिक्षणासाठी यशस्वी कार्य होत राहो हीच सदिच्छा!

- **संदर्भसाहित्य**


1) शासन निर्णय सप्टेंबर 2014 मानव संसाधन विकास मंत्रालय ,भारत सरकार, स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय.

2) 'स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय'राष्ट्रीय अभियानाची मार्गदर्शिका.

3) संचालक, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) डिसेंबर 2014ची मार्गदर्शिका.

4) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मे 2016 मासिक पाळी व्यवस्थापन राज्य मार्गदर्शिका.

5) प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,24एप्रिल 2017 चे पत्र.

6) शासन परिपत्रक- शाळा स्तरावर मासिक पाळी व्यवस्थापन व स्वच्छतेच्या सवयी.

7) मा.आयुक्त शालेय शिक्षण मार्च 2017 चे जिल्हा परिषद सीईओंना पत्र.

8) शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य जानेवारी 2018 संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे.

9) निष्ठा मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार ,डिसेंबर 2019 संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे.

10) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 20

11) http://samata.shiksha/mr/12) www.unisef.

13) mhm.youtube.com14) www.mhmscreenprinting.com

15) menstrual/hygieneday.org

16) www.mhmservices.com

17) www.mhm.org.uk



| मोड्यूल विकसक | समन्वयन | मार्गदर्शक |
|---|---|---|
| डॉ. अंजली रसाळ, | डॉ.ज्योती कुलकर्णी | डॉ.नेहा बेलसरे |
| वरिष्ठ अधिव्याख्याता, | समन्वयक | संचालक |
| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर. | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |